Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

# Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101 Vol. I

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editors**
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

37. भारतातील महत्त्वपूर्ण संप्रदाय : शैव संप्रदाय 101
भिकाणे शोभा राजेंद्र

38. प्राचिन भारतातील शैव परंपरा 105
शिंदे संदीप शिवाजीराव

39. धार्मिक चळवळीतील वंचीतांचे योगदान-- आदिवासी 107
डॉ. बी.एस.क्षिरसागर , प्रा. जी. एम. घुटे

40. विरशैव संप्रदाय 110
प्रा.डॉ.बोचरे जे.एम

41. तांत्रिक पंथाचे विचार 112
प्रा. डॉ. सुभाष रामराव रगडे

42. धार्मिक चळवळी व बौध्द धम्म 114
प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे

43. सुफी संप्रदायाच्या तात्त्वीक भूमिकेचा विकास 118
प्रो.डॉ.शारदा गोविंदराव बंडे

44. भारतातील बौध्द धम्म चळवळ- एक दृष्टिक्षेप 120
प्रा.डॉ. बी.एम.नरवाडे

45. महात्मा बसवेश्वर आणि संत गाडगेबाबा 123
प्रा.सचितानंदशं.बिचेवार

46. लिंगायत धर्म लोकचळवळ : महात्मा बसवेश्वराचे धार्मिक व सामाजिक सुधारणेतील योगदान 127
प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे

47. धार्मिक चळवळींचा स्थापत्यादी कलांवर पडलेला प्रभाव 130
प्रा.डॉ. महेंद्र यादवराव घनसावंत

48. वर्तमान सामाजिक व धार्मिक एकात्मतेसाठी-भक्ती चळवळीची उपयुक्तता 133
डॉ.संतोष सुधाकरराव कोटुरवार

49. संत तुकाराम व संत रामदास यांच्या साहित्यातून समाजदर्शन 135
प्रा. सौ. गीता विशे

50. भारतीय राजकारणातील धर्माचा वाढता प्रभाव - एक दृष्टिक्षेप 139
प्रा.सि.एन पुरी

51. शैव पंथातील नाथ संप्रदाय 143
प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे

52. नाथ संप्रदायाचे तत्त्वज्ञान व त्याचा प्रभाव एक अभ्यास 146
प्रा.धनेश मधुकर हरड

53. पूर्व मध्ययुगीन महाराष्ट्रातील संत चळवळ : एक आकलन 148
प्राचार्य डॉ. बबन पवार

Co-ordinator
IQAC
...ddhiswami Mahavidyalaya

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

# प्राचिन भारतातील शैव परंपरा

शिंदे संदीप शिवाजीराव
श्री गुरू बुध्दीस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं.)

---

प्रस्तावना :–

प्राचिन भारतात अनेक धर्म संप्रदायाचा उदय झाला. त्यात वैदिक परंपरा सर्वात प्राचिन धर्म परंपरा म्हणुन ओळखली जात होती. परंतु हडप्पा संस्कृतीच्या षोधामुळे सर्वात प्राचिन वैदिक परंपरेच्या भुमिकेला छेद मिळाला. तरी एम. के. ढवळीकरांसारख्या इतिहास अभ्यासकांनी वैदिक धर्म व हडप्पा कालीन धर्मावर सहसंबंध दर्षविणारी विधाने केली आहेत. वैदिक धर्म व हडप्पा कालीन धर्म एकत्त्या संबंधी इतिहास अभ्यासकामध्ये मतभेद असले तरी वैदिक धर्माच्या प्राचिनते विषयी इतिहास अभ्यासकामध्ये मतभेद नाहीत. भारतामध्ये वैदिक धर्म जनप्रिय होता. या धर्म परंपरेला माननारा मोठा वर्ग प्राचिन भारतामध्ये आस्तित्वामध्ये होता. कालांतराने वैदिक धर्मामध्ये कर्मकांड निर्माण झाले. या कर्मकांडाला विरोध करण्यासाठी जैन व बौध्द धर्म परंपरेचा उदय झाला. या दोन्ही धर्मांनी वैदिक कर्मकांड व वर्ण व्यवस्थेवर टिका केली. आपल्या धर्माचे तत्वज्ञान विषद केले. बौध्द व जैन धर्माला सुध्दा प्राचिन भारतामध्ये मोठया प्रमाणात अनुयायी वर्ग लाभला. वैदिक परंपरेला विरोध म्हणुन प्राचिन भारतात लोकायत अजीवक सारखे भौतिकवादी व भोगवादी संप्रदाय निर्माण झाले. वैदिक धर्मामध्ये उपसंप्रदायाची निर्मीती वैदिककाला नंतर सुरू झाली. पुरानाच्या निर्मीतीनंतर देवांची संख्या वाढत गेली. प्रत्येक देवाला माननारा संप्रदाय पुढे येऊ लागला. यातुनच वैदिक परंपरेमध्ये वैष्णव षैव शाक्त, गाणपत्य व सुर्यउपासक संप्रदाय निर्माण झाले. हे हिंदु धर्मातील लोकप्रिय संप्रदाय म्हणुन ओळखले जाऊ लागले. यात आपणाला प्राचिन भारतातील शैव परंपरेचा विचार करावयाचा आहे.

समस्या सुचण :–

प्राचिन भारतामधील धार्मीक चळवळीमध्ये षैव पंथ अग्रेसर होता. षैव पंथाला कोणत्या राजांनी राजाश्रय दिला? प्राचिन भारतातील इतिहासातषैव पंथाचा उल्लेख व पुरावे आहेत काय? प्राचिन भारतातील काही राजे, सरदार व विदवानांनी षैव पंथाची उपासना व आराधना केली होती काय? राजे व सरदारांनी षैव पंथी उपाध्या लावुन घेतल्या होत्या काय? गुप्त व गुप्तोतर कालखंडात षैव संप्रदायाची स्थिती काय होती? आसे अनेक प्रष्न निर्माण होतात. म्हणुन प्राचिन भारतामधील षैव परंपरेचा अभ्यास करणे आवष्यक आहे. प्रस्तुत्त षोध निबंधामध्ये वरील प्रष्नांची सोडवनुक करण्याचा प्रयत्न केला आहे.

विषय विवेचन :–

षैव परंपरा भारतातील प्राचिन परंपरेपैकी एक आहे. षैव संप्रदाय षिव व महादेवाचा उपासक आहे. या संप्रदायामध्ये षिवाची पुजा मुर्ती व लींग रूपा मध्ये होते. षैव परंपरेची मुळे सिंधु संस्कृती पर्यंत जातात. मोहनजोदडो येथे सापडलेल्या मुहरे वर एका योगीची आकृती कोरली आहे.[1] ही आकृती पाहील्यावर पशुपती षिवाची आठवण झाल्या षिवाय राहत नाही. एवढेच नाही तर हडप्पा संस्कृती मध्ये लींग आकृती सापडल्या आहेत. यावरून आपण लींग पुजेची कल्पना करू शकतोत. आज सुध्दा षिवाची लींग स्वरूपात पुजा केली जाते. म्हणुन शैव परंपरा भारतातील सर्वात प्राचिन धार्मिक परंपरेपैकी एक ठरते. हडप्पा संस्कृतीनंतर वैदिक, मौर्य, शुंग इ. काळामध्ये सुध्दा शैव परंपरेला जनआधार होता. प्राचिन काळापासुन शैव परंपरेला दृष्य व अदृष्य स्वरूपात अनुयायी वर्ग मिळाला. सातवाहन राजा हाल ने आपला ग्रंथ गाथासप्तषीची सुरूवात षिवाच्या प्रार्थनेने केली आहे.[2] षिव व महादेवाची आराधना करणारे लोक शैव म्हणुन ओळखले जातात. गुप्त काळामध्ये राजे वैष्णव होते. पण त्यांनी धार्मिक सहीष्णुतेचे धोरण ठेवल्याने शैव पंथाचा सुध्दा मोठया प्रमाणात प्रचार झाला. करमदंडा अभिलेखात उल्लेख आहे की, कुमार गुप्त पहिल्याचा मंत्री पृथ्वीसेनने षिव मंदीरासाठी दान दिले. स्कंदगुप्ताचा सरदार हस्तीन षिव उपासक होता. गुप्त काळात मोठया प्रमाणात षिव मंदीरे व साहित्याची निर्मीती झाली. षिव साहित्या मधुन षिवाचा महिमा गाईला गेला. गुप्तकाळात वैष्णव व शैव या दोन्ही पंथाची मंदीरे मोठया प्रामाणात निर्माण झाली. गुप्तकाळा मधील प्रसिध्द साहित्यीक कालीदास षिव उपासक होता.[3] कालीदासाने महाकाव्य रघुवंषची सुरूवात 'पार्वती–परमेष्वरो' च्या वंदनेने केली आहे. कालीदासाच्या साहित्यामध्ये षिवाच्या विविध रूपांचा, मतांचा व तत्वांचा उल्लेख आला आहे. पुरानामध्ये सुध्दा षिवाचा उल्लेख आला आहे. पुराणात षिवाला देवात श्रेष्ठ महादेव म्हटले आहे. गुप्तकाळात रचल्या गेलेल्या वायु पुराण व मत्स पुराणामध्ये षिव पुजेचे विस्तृत विवेचन आहे. एकुण गुप्त काळामधील राजे, सरदार, विदवान षिव उपासनेला अनुकुल होते. तत्कालीन साहित्यामध्ये सुध्दा शैव परंपरेचा उल्लेख आहे.

प्राचिन भारतातील राजांनी धर्म सहिष्णुतेच्या धोरणाची अमलबजावणी केली. शैव, वैष्णव, षाक्त, बौध्द व जैन इत्यादी. सर्व धर्मांना समानतेची वागणुक दिली. हिंदु धर्मातील बहुदेव वादाचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न झाला. शैव परंपरा सामान्य जनतेमध्ये रूजली होती. षिव सर्व सामान्याचा देव बनला होता. म्हणुन ब्रम्ह, विष्णु व महेष या तीन दैवताची एकत्रीत त्रीमुर्ती तयार करून पुजा केली जाऊ लागली. या त्रीदेवामधील ब्रम्हा हे सजर्न व निर्मितीचे प्रतिक आहेत. विष्णु रक्षण व पालनकर्ता म्हणुन ओळखला जात असे. तर षिव संहाराचे प्रतिक होते. या तीन्ही कल्पना एकत्रीत

त्रीमुर्ती व त्रिदेवाच्या स्वरूपात रूजल्या आहेत. षिवाची दोन स्वरूपात पुजा केली जाते. यात मानव मुर्ती म्हणुन पुजा केली जाते आणि लींग स्वरूपात सुध्दा पुजा केली जाते. लिंग उपासनेचा उल्लेख महाभारतातील अनुषासन पर्वामध्ये आलेला आहे.[4] याच बरोबर मत्स पुराणामध्ये बाणासुर षिव लिंगाला डोक्यावर घेउन आराधना करत आसल्याचा उल्लेख आहे. नागोद येथे मिळालेला षिवलींग अत्यंत महत्वाचा आहे. तो कलात्मक दृष्टया सुध्दा अत्यंत महत्वाचा आहे. कोसाम मधील मानवी स्वरूपातील षिव–पार्वतीची मुर्ती सुध्दा उल्लेखनीय आहे. षिवाची पुजा अर्धनारीष्वर म्हणुन सुध्दा केली जात होती. षिव–पार्वती मुर्ती हे अर्ध–नारीष्वराचे रूप आहे. या दोन रूपाच्या एकत्री करणातुन षैव व शाक्त पंथाला जवळ आणण्याचा प्रयत्न झाला आहे. शैव शाक्त व वैष्णव पंथाचा समन्वय गुप्त व गुप्तोतर कालखंडामध्ये घडुन आला आहे. चिनी प्रवासी हयुनन्सांगने षिवाचा उल्लेख केला आहे.[5] हर्षचरित मध्ये बाणभटट लिहतो की, स्थानेष्वर मध्ये खण्डपरेषु (षिव) ची पुजा होते. हर्षवर्धन सुरवातीच्या काळात शैव होता. वासखेरा व मधुवन ताम्रलेखामध्ये हर्षवर्धन षिवपुजक असल्याचे स्पष्ट होते. कामरूपचा राजा भास्कर वर्मन शैव होता. हयुनन्सांगने षषांकच्या अत्याचारपुर्ण षिवभक्तीचा उल्लेख केला आहे. पाल, सेन, चंदेल राजांचे अभिलेख ओमनमः षिवाय या प्रार्थनेने सुरू होतात. कलचुरी अभिलेखामध्ये राजा परम ने माहेष्वर पदवी घेतली आहे. भोजषैव होता. त्याने लीहीलेला 'तत्वपरीक्षा' ग्रंथ षैव सांप्रदायाच्या संबंधीत होता. राजा भोजने उदयपुर येथे निलकंठेष्वर मंदीर बनविले उज्जैन षैव धर्माचे गढ होते. उज्जैन मधील महाकाल मंदीर प्रसिध्द होते. षैव परंपेमध्ये सर्वात प्राचिन परंपरा पाषुपत होती. पाषुपत लींगाची पुजा करत होते. कापालीक अतीमार्गी होते. रामानुज आपल्या श्रीभाष्य ग्रंथात कापालीकाचे वर्णन अषा प्रकारे करतात की, 'वे खोपडी में भोजन करते थे, षरीर में राख मलते थे, हाथ में गदा रखते थे ! सुरापात्र मे विदयमान दैवता की पुजा करते थे!' कापालीक नरमुंडमाळ घालत, स्मषानात राहत, कालमुखभैरवाची पुजा करत. भैरवाला नरबळी व मदिरा अर्पण करत होते. षैव परंपरेतील हा तांत्रिक उपपंथ होता.षैव परंपरेमध्ये अनेक उपपंथ निर्माण झाले. पाषुपत, कापालीक, कालामुख लींगायत इत्यादी. उपपंथ षैव परंपरेमध्यें निर्माण झाले. हे सर्व उपपंथ षिवाला ईष्वर मानत होते. पण षिवाची आराधना करण्याचे मार्ग वेगवेगळे होते.

**निष्कर्ष :–**

प्राचिन भारमामध्ये शैव परंपरा सर्वात लोकप्रिय होती. भारतातील सर्वात प्राचिन धार्मिक परंपरेपैकी एक शैव परंपरा होती. या संदर्भात इतिहासकार हरिषंकर लोहीयाल म्हणतात की, 'हिंदु धर्म के अंतर्गत जितने संप्रदाय थे उनमे शैव संप्रदाय सबसे अधिक प्रबल था ! जनसाधारण के अतिरीक्त अनेक राजवंषो ने शैव धर्म आपनाया और मंदीर बनवाये !' सामान्य जनते बरोबर राजे, सरदार व विदवानांनी षैव परंपरा स्वीकारली. भोज, हर्षवर्धन, इत्यादी राजे शैव होते. स्कंदगुप्ताचा मांडलीक राजा हस्तीन षिव उपासक होता. माहेष्वर, माहीष्पती इत्यादी शैव धार्जीन उपाध्या राजांनी स्वतःला घेतल्या होत्या. एकुण गुप्त व गुप्तोत्तर कालखंडामध्ये शैव परंपरेचा मोठया प्रमाणात विकास झाला. सामान्य जनते बरोबर राजे सरदार व विदवानांनी शैव परंपरा स्वीकारली. याच काळात षैव मंदीराची मोठया प्रमाणात निर्मीती झाली.

**संदर्भ :–**

1. मार्डिकर मदन प्राचिन भारताचा इतिहास विदया बुक्स पब्लिषर्स औरंगाबाद प्रथम आवृती जुन 1997 पृ.क.370
2. श्रीवास्तव के.सी. प्राचिन भारत का इतिहास तथा संस्कृती युनायटेड बुक डेपो आलाहाबाद चौहदवी आवृत्ती 2018–19 पृ.क.309
3. चौधरी प्र.का. प्राचिन भारताचा इतिहास व संस्कृती विदया बुक पब्लिषर्स औरंगाबाद पहिली आवृत्ती ऑक्टोंबर 2002 पृ.क.415
4. डी.एन.झा आणि कृष्णमोहन श्रीमाली प्राचिन भारत का इतिहास हिंदी माध्यम कार्यान्वय निदेषालय, दिल्ली विष्वविदयालय – 37 वा पुनमुर्दण 2014 पृ.क.321
5. डी.एन.झा आणि कृष्णमोहन श्रीमाली प्राचिन भारत का इतिहास हिंदी माध्यम कार्यान्वय निदेषालय, दिल्ली विष्वविदयालय – 37 वा पुनमुर्दण 2014 पृ.क.397

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani